स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांची मूळ नियुक्ती बांधकाम अंर्तगत असल्यामुळे त्यांचे बांधकाम विभागांतर्गत समायोजन करणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
जिल्हा परिषद आदेश. क्र. बांध/आस्था-२/२८३/२०२६
दिनांक ९/३/२०२६

संदर्भः वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. असंक-१००१/प्र.क्र.२९/ २००१/ वित्तीय सुधारणा दिनांक १०/०९/२००१

ज्याअर्थी, जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत यापूर्वी बांधकाम, जलसंधारण व पाणीपुरवठा हे विभाग एकत्रित स्वरूपात बांधकाम उत्तर विभागाकडे कार्यरत होते, त्यामुळे बांधकाम, जलसंधारण व पाणीपुरवठा या विभागांसाठी स्वतंत्र नियुक्ती दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना त्यांच्या संबंधित मूळ आस्थापनेवर कार्यरत असणे अपेक्षीत आहे.

ज्याअर्थी, खालील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची मूळ नियुक्ती बांधकाम विभागामध्ये झालेली असतानाही त्यांचा जलसंधारण विभागाच्या सेवाजेष्ठतेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी, मा. आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.), छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक ०१/०१/२०२५ रोजी जिल्हा परिषद यंत्रणेतील तात्पुरती सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध केलेली असून, त्यामध्ये अनुक्रमांक १, ३ व १७ वर संबंधित कर्मचारी यांची नावे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

सबब, वरील सर्व बाबींचा विचार करून तसेच प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने, खालील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांचे बांधकाम विभागांतर्गत खालीलप्रमाणे रकाना क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या कार्यालयामधून रकाना क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी या आदेशाच्या दिनांकापासून समायोजन करण्यात येत आहे.

सदर समायोजन हे प्रशासकीय कारणास्तव करण्यात येत असून संबंधित कर्मचाऱ्यांनी आदेशाच्या दिनांकापासून समायोजनाने दिलेल्या पदस्थानेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. तसेच, संबंधित विभाग प्रमुखांनी कार्यमुक्ती व कार्यभार स्वीकृतीची कार्यवाही त्वरित पूर्ण करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव | सध्या कार्यरत कार्यालयाचे नांव | समायोजनाने पदस्थापना देण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. राहुल जगन्नाथ सोनवणे | जि.प.ल.पा. उपविभाग पारनेर | जि.प.सा.बा. उपविभाग-पारनेर |
| २ | श्री.संपत शेषराव सोनवणे | जि.प.ल.पा. उपविभाग नेवासा | जि.प.सा.बा. उपविभाग-नेवासा |

तसेच संबंधीत कर्मचा-यांचे समायोजन बांधकाम विभागांतर्गत करण्यात आले असल्याने त्यांचे वेतन व भत्ते बांधकाम विभागांतर्गत अदा करावेत.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून त्याचा संकेतांक क्र.202603091300017 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 08-03-2026 17:12:15
आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

१.श्री-राहूल जगन्नाथ सोनवणे स्थापत्य अभि.सहा जि.प. ल.पा.उप विभाग पारनेर
२. श्री.संपत शेषराव सोनवणे स्थापत्य अभि.सहा जि.प. ल.पा.उप विभाग नेवासा
कार्यालय प्रमुखा मार्फत

प्रत- मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितासाठी
प्रत- कार्यकारी अभियंताजि.प.सा.बा. उत्तर / दक्षिण विभाग अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत- कार्यकारी अभियंता लघुपाट बंधारे विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती नेवासा /पारनेर
प्रत उप उभियंता जि.प.ल.पा./ सा.बा. उप विभाग नेवासा / पारनेर
प्रत- सहाय्यक लेखाधिकारी पंचायत समिती नेवासा / पारनेर

२/- वरील आदेशमध्ये नमूद स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे समायोजनाच्या ठिकाणी हजर न झाल्यास त्यांचे वेतन व भत्ते अदा करु नये.